जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

03 SEP 2022 लोकमत



कोल्हापुरात शुक्रवारी भारतीय इतिहास संशोधन परिषद- शिवाजी विद्यापीठातील सामंजस्य कराराबाबतच्या लेटर ऑफ इंटेट परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना दिले. यावेळी डावीकडून नंदकुमार, नीलांबरी जगताप, एम. एस. देशमुख, अवनिश पाटील, अरुण भोसले उपस्थित होते.

# मराठ्यांचा इतिहास राष्ट्रीय पातळीवर नेणार : उमेश कदम

## इतिहास संशोधन परिषद-शिवाजी विद्यापीठातील करारास मान्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भाषिक साधने पुढे आणून भारतीय दृष्टिकोनातून इतिहास लेखन व्हावे यासाठी भारतीय इतिहास संशोधन परिषदेने विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. याअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू मराठा इतिहास अध्ययन केंद्रातील मोडी लिपीतील कागदपत्र, जनभाषेतील ज्या साधनांचा वापर प्रत्यक्षात इतिहास लेखनात झालेला नाही ती कागदपत्र, साधने डिजिटल स्वरूपात इतिहास संशोधन परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहेत, अशी माहिती या परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी शुक्रवारी येथे पत्रकार परिषदेत दिली.

या विशेष कार्यक्रमांतर्गत इतिहास संशोधन परिषद आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्याबाबत प्राथमिक चर्चा करण्यासाठी डॉ. कदम कोल्हापुरात आले होते. सामंजस्य कराराबाबत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्यासमवेत चर्चा केली. त्यांनी सकारात्मकता दर्शवित तत्त्वतः मान्यता दिली. पाच वर्षांसाठीचा करार येत्या दोन महिन्यांत होईल, असे त्यांनी सांगितले. विद्यापीठातील मराठा अध्ययन केंद्रात २ लाख ९६ हजार मोडी लिपीतील कागदपत्र, ६१२ सीडी आहेत.

त्याचे वर्गीकरण झाल्यानंतर डिजिटायझेशन, भाषांतर, प्रकाशन करता येणार असल्याचे इतिहास विभागप्रमुख प्रा. अवनीश पाटील यांनी सांगितले. दरम्यान, सामंजस्य कराराच्या लेटर ऑफ इंटेट (इरादापत्र) आदान-प्रदानावेळी डॉ. एम. एस. देशमुख, अरुण भोसले, नीलांबरी जगताप, नंदकुमार मोरे, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

### डिजिटल प्लॅटफॉर्म, मोबाइल म्युझियम

डिजिटल प्लॅटफॉर्म, मोबाइल म्युझियम संकल्पनेवर परिषदेचे काम सुरु आहे. इतिहास जनसामान्यांपर्यंत अधिक परिणामकारकरीत्या पोहचविण्याचा प्रयत्न आहे. प्राचीन ते अर्वाचीन काळातील छोट्या गावांमधील इतिहासातील नायकांची माहिती, घटनांची नोंद करण्यात येत आहेत. पूर्ण झाल्यानंतर राष्ट्रीय पातळीवर उपलब्ध करुन दिले जाईल, असे डॉ. कदम यांनी सांगितले.

03 SEP 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ - आयसीएचआरमध्ये लवकरच करार



कोल्हापूर : भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कामत यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेतली. यावेळी डॉ. अवनीश पाटील व मान्यवर.

- आयसीएचआरचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांची माहिती
- बोलीभाषेतील साधनांचे होणार डिजिटलायझेशन
- पहिल्या टप्प्यात सकारात्मक चर्चा

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशातील बोलीभाषांमध्ये असलेला स्थानिक इतिहास हा राष्ट्रीय इतिहासाचा भाग बनावा या भूमिकेतून भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेने डिजिटलायझेशन हाती घेतले आहे. त्यासाठी देशातील ३६ विद्यापीठांतील केंद्रे निश्चित केली आहेत, त्यात शिवाजी विद्यापीठाचा समावेश आहे. विद्यापीठातील मोडी कागदपत्रांसंदर्भात पहिल्या टप्प्यातील बैठकीत सकारात्मक चर्चा झाली आहे. दोन महिन्यांनतर दुसऱ्या टप्प्यात शिवाजी विद्यापीठ आणि भारतीय इतिहास अनुसंधान परिषदेत करार होणार आहे, अशी माहिती परिषदेचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी दिली.

नवी दिल्ली येथील भारतीय इतिहास अनुसंधान परिषदचे सदस्य सचिव डॉ. उमेश कदम यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची भेट घेतली. यावेळी विद्यापीठातील छत्रपती शाहू मराठा इतिहास अध्ययन केंद्राचे प्रमुख डॉ. अवनीश पाटील उपस्थित होते. आरसीएचआर आणि शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या करारासंदर्भात प्राथमिक चर्चा झाली. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत डॉ. कदम बोलत होते.

डॉ. कदम म्हणाले, प्राचीन, अर्वाचीन इतिहास हा राज्य, जिल्हा अन् छोट्या गावांत लपला आहे त्याच्या अभ्यासातून आतापर्यंत ४ खंड प्रकाशित झाले आहेत. आयसीएचआरने आसाम, काश्मीर, कर्नाटकातील विद्यापीठाशी असा करार केली आहे. शिवाजी विद्यापीठात छत्रपती शाहू मराठा इतिहास अध्ययन केंद्राने बोलीभाषा, मोडलिपीतील मराठ्यांचा इतिहास भाषांतरीत करावा, त्यासाठी इतिहास संशोधन परीषद संपूर्ण सहकार्य करेल.

## स्थानिक इतिहास राष्ट्रीय स्तरावर नेण्यासाठी प्रयत्नशील : डॉ. कदम

बोलीभाषा, मोडी लिपीतील सर्व साधने ही राष्ट्रीय अर्काईव्ह लायब्ररीचा भाग आहे. सतराव्या आणि अठराव्या शतकातील मराठ्यांचा इतिहास हा स्थानिक इतिहास आहे. बोलीभाषातील हा इतिहास राष्ट्रीय इतिहासाचा भाग बनावा, हा आयसीएचआरचा हेतू आहे. परकियांनी त्यांच्या डॉक्युमेंटवर आधारीत भारतीय इतिहास लिहिला आहे. पण खरा इतिहास बोलीभाषा, मोडीलिपीत लपला आहे. तो जगासमोर येण्याची गरज आहे.

डॉ. अवनीश पाटील म्हणाले, अध्ययन केंद्रात २ लाख ९६ हजार मोडी लिपीतील कागदपत्रे, ६१२ सीडी आहेत. तसेच ३४ मॉनिटरवर हा डाटा सेव्ह आहे. याचे कॅटलॉग करण्यासाठी आयसीएचआरची मदत होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
0 3 SEP 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्थानिक इतिहास राष्ट्रीय स्तरावर नेण्याचा प्रयत्न

## भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे डॉ. उमेश कदम, शिवाजी विद्यापीठास भेट

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

स्थानिक पातळीवरील इतिहास हा राष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी आयसीएचआरच्या माध्यमातून प्रयत्नशील असल्याचे भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, तसेच कोल्हापूरचे सुपुत्र डॉ. उमेश अशोक कदम यांनी सांगितले. त्यांनी शुक्रवारी शिवाजी विद्यापीठास भेट दिली, त्यानंतर ते बोलत होत.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या भेटीप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत भारतीय इतिहास संशोधन परिषदेचे डॉ. उमेश कदम.**

भेटीदरम्यान त्यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के यांच्यासमवेत बैठक घेतली. त्यांनी मराठा इतिहास, तसेच स्थानिक इतिहासातील संदर्भाच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण चर्चा केली. विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज सेंटर ऑफ स्टडीज फॉर मराठा हिस्ट्री या केंद्राच्या ताब्यात असलेल्या १६ ते १८ व्या शतकांतील ऐतिहासिक मोडी लिपीतील कागदपत्रांतून इतिहासाची नवी दालने खुली होण्याच्या अनुषंगानेही यावेळी चर्चा केली.

डॉ. कदम म्हणाले, वेगवेगळ्या भाषांतील कागदपत्रे सर्वच ठिकाणी पोहोचण्यासाठी डिजिटल प्लॅटफॉर्म लायब्ररी ही संकल्पना राबवली जाणार आहे. याबाबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी चर्चा केली आहे. त्यांनी मान्यता दिली असून, दोन महिन्यांत काम सुरु होईल.

छत्रपती शाहू महाराज सेंटर ऑफ स्टडीज फॉर मराठा हिस्ट्री शिवाजी विद्यापीठाचे विभागप्रमुख अवनिश पाटील यांनी विभागात २ लाख ९६ हजार कागदपत्रे व ६१२ सीडी आणि ३४ टीव्हीवरील डाटा हा उपलब्ध असल्याचे सांगितले.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात आज स्टार्टअप यात्रा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात आज, शनिवारी दुपारी तीन वाजता स्टार्टअप यात्रा उपक्रम होणार आहे. त्यात उद्योग, स्टार्टअपना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता, नावीन्यता विभागांतर्गत संकल्पनांची माहिती दिली जाणार आहे. त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. एस. एस. देशमुख यांनी केले.

पुढारी

# विद्यापीठात आज स्टार्टअप यात्रा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये शनिवारी (दि. ३) दुपारी ३ वाजता राज्य शासनाच्या स्टार्ट अप यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या प्रांगणात होणाऱ्या कार्यक्रमात उद्योग व स्टार्टअप यांना प्रोत्साहन देण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागांतर्गत विविध संकल्पनांची माहिती मिळणार आहे.

लोकमत

# विद्यापीठात वि. स. खांडेकर यांना अभिवादन

कोल्हापूर : ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ मराठी साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील खांडेकर स्मृती संग्रहालय येथे सकाळी भावपूर्ण वातावरणात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप, मराठी अधी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, रणधीर शिंदे, तृप्ती करेकट्टी, दीपक भादले, सुरेंद्र उपरे, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

लोकमत

# व्ही. एन. शिंदे यांना प्रा. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार जाहीर

## पुणे विद्यापीठात सोमवारी होणार वितरण

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** इंडियन फिजिक्स असोसिएशन या संस्थेच्या पुणे विभागाने मराठीतून विज्ञान प्रसाराच्या कार्यासाठी



देण्यात येणारा प्रतिष्ठेचा यंदाचा प्रा. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा विज्ञान साहित्यिक डॉ. व्ही. एन. शिंदे यांना जाहीर केला. या पुरस्काराचे वितरण सोमवारी (दि. ५) दुपारी चार वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागामध्ये ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी विज्ञान साहित्य, कार्यशाळा आणि ललित लेखनाद्वारे केलेले विज्ञान प्रसाराचे कार्य विशेष उल्लेखनीय असल्याने त्यांची या पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली असल्याची माहिती इंडियन फिजिक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय ढोले आणि सचिव डॉ. विकास मठे यांनी पत्राद्वारे दिली.

> उमजलेलं सांगावं, या सहज भावनेतून मी लेखन करत आलो आहे. लोकांना ते आवडले. त्यासाठी १९६० च्या दशकात मराठी भाषेतून विज्ञान प्रसारासाठी लेखन करणाऱ्या मो. वा. चिपळोणकर यांच्या नावे मिळालेला हा पुरस्कार प्रेरणा देणारा आहे.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे**

यापूर्वी हा पुरस्कार डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, डॉ. पंडित विद्यासागर, अनिल लचके आणि सुनील विभूते यांना देण्यात आला आहे. डॉ. शिंदे यांची एककांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार आणि आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना विविध पुरस्कार मिळाले आहेत.

पुढारी



# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षेस ६,२२७ विद्यार्थी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मार्च-एप्रिल २०२२ उन्हाळी सत्र परीक्षेअंतर्गत शुक्रवारी पाच विषयांची परीक्षा झाली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील ६,२२७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. शुक्रवारी बीए., बीए बीएड, एमबीए आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या.

पुण्यनगरी

# वि. स. खांडेकर यांना अभिवादन

**कोल्हापूर :** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ मराठी साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवारी शिवाजी विद्यापीठात त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यात आले. विद्यापीठातील वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे भावपूर्ण वातावरणात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते वि. स. खांडेकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला.यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांच्यासह डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, प्रा. दीपक भादले, डॉ. सुरेंद्र उपरे, उदयसिंह राजेयादव आदी उपस्थित होते.

सकाळ

# वि. स. खांडेकरांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातर्फे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते ज्येष्ठ मराठी साहित्यिक वि. स. खांडेकर यांच्या ४६ व्या स्मृतिदिनानिमित्त आज अभिवादन केले. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय येथे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, प्रा. दीपक भादले, डॉ. सुरेंद्र उपरे, उदयसिंह राजेयादव उपस्थित होते.

0 3 SEP 2022 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिंदेंना प्रो. चिपळोणकर पुरस्कार

## पुण्यात सोमवारी होणार वितरण सोहळा

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. २ :** इंडियन फिजिक्स असोसिएशनच्या पुणे विभागातर्फे मराठीतून विज्ञान प्रसाराच्या कार्यासाठी देण्यात येणारा प्रतिष्ठेचा प्रा. मो. वा. चिपळोणकर पुरस्कार २०२२ शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांना जाहीर झाला आहे. येत्या ५ सप्टेंबरला दुपारी ४ वाजता सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात ज्येष्ठ साहित्यिक रंगनाथ पठारे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. इंडियन फिजिक्स असोसिएशनचे अध्यक्ष प्रा. डॉ. संजय ढोले आणि सचिव डॉ. विकास मठे यांनी ही माहिती पत्राद्वारे कळवली आहे.



**व्ही. एन. शिंदे**

डॉ. शिंदे यांनी विज्ञान साहित्य, कार्यशाळा आणि ललित लेखनाद्वारे केलेले विज्ञानप्रसाराचे कार्य विशेष उल्लेखनीय असल्याचे यात नमूद करण्यात आले असून, त्यांची पुरस्कारासाठी एकमताने निवड करण्यात आली असल्याचे म्हटले आहे. यापूर्वी हा पुरस्कार डॉ. जयंत नारळीकर, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, डॉ. पंडित विद्यासागर, डॉ. अनिल लचके, डॉ. सुनील विभूते यांना दिला आहे.

डॉ. शिंदे यांची एककांचे मानकरी, असे घडले भारतीय शास्त्रज्ञ, हिरव्या बोटांचे किमयागार आणि आवर्तसारणी व मूलद्रव्यांची दुनिया ही पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचा विज्ञान साहित्यासाठीचा महात्मा जोतिराव फुले पुरस्कार-२०१९, दक्षिण महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कृ. गो. सूर्यवंशी पुरस्कार, मिरजेच्या चैतन्य शब्दांगण साहित्य सभेचा (कै.) अशोक कोरे पुरस्कार आणि निमशिरगाव साहित्य सुधा विचार मंचचा पी. बी. पाटील साहित्य पुरस्कार मिळाला आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

0 3 SEP 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात प्रथमच 'सेन्चुरी पाम' फुलोरा

## वनस्पतीशास्त्रज्ञांसाठी दुर्मिळ नजारा : लीड बोटॅनिकल गार्डनमध्ये रोपन केल्यानंतर २४ वर्षांनी फुलला

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

सेंच्युरी पाम या ताडाच्या प्रजातीस सुमारे ८० वर्षांच्या आयुष्यात एकदाच येणारा फुलोरा वनस्पतींच्या विश्वामध्ये सर्वाधिक मोठा आणि तितकाच दुर्मिळ म्हणून ओळखला जातो. विद्यापीठाच्या लीड बॉटनिकल गार्डनमध्ये या प्रजातीचे ताड २४ वर्षांपूर्वी लावले असून, यंदा या वनस्पतीला फुलोरा आला आहे. वनस्पतीशास्त्रज्ञ व वनस्पतीप्रेमींसाठी हा दुर्मिळ नजारा पाहण्याची संधी आहे, अशी माहिती ज्येष्ठ वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. श्रीरंग यादव यांनी दिली.

सेन्चुरी पाम या वनस्पतीचे कोरिफा अम्ब्राकुलीफ्लोरा असे शास्त्रीय नाव आहे. सेन्चुरीऑन ट्री, तालेपाम, तालापॉटपाम, ताडपत्री अशा विविध नावांनी ओळखला जातो. आशिया, ऑस्ट्रेलिया खंडामध्ये कोरीफाच्या पाच प्रजातीपैकी तीन प्रजाती भारतात ढळतात. कोरिफा अम्ब्राकुलीफ्लोरा हा देखणा विशाल ताड आहे. तो दक्षिण भारतातील घनदाट जंगलांमध्ये वाढतो. उडुपीजवळील याना येथील जंगलांमध्ये याचे अनेक वृक्ष आढळतात. 'सेन्चुरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या लीड बॉटनिकल गार्डनमधील सेंच्युरी पामला आलेला फुलोरा.

पाम"चे आयुष्य शंभर वर्षे असते, असा समज असला तरी प्रत्यक्षात या ताडाच्या वेगवेगळ्या प्रजातींचे आयुष्य २५ ते ८० वर्षांपर्यंत असते. या वृक्षाची पूर्ण वाढ झाल्यानंतर त्याला २५ ते ८० वर्षांमध्ये केव्हाही फुलोरा येतो. लाखो फुले बहरलेला हा फुलोरा वनस्पती विश्वातील सर्वात मोठा मानला जातो. बिया तयार झाल्यानंतर वृक्ष वठतो, याला मोनोकार्पी म्हणतात. सन १९९८ मध्ये सावंतवाडी येथील सेंच्युरी पामला फुलोरा आला होता. त्याच्या बिया शिवाजी विद्यापीठाने आणून विद्यापिठातील लीड बॉटनिकल



ताड असून कोणत्याही उद्यानामध्ये सर्वांसाठी तो आकर्षणबिंदू असतो. हा ताड उष्णकटिबंध व समशितोष्ण कटिबंधामधल्या वातावरणात सर्व प्रकारच्या जमिनींत योग्य पाणीपुरवठ्याने वाढवता येतो. या

### बहुपयोगी सेंच्युरी पाम

पूर्वी दक्षिण व दक्षिणपूर्व आशियामध्ये या ताडाची पाने हस्तलिखितासाठी वापरली जात होती. फिलीपाईन्समध्ये या ताडाला बुरी किंवा बुखी या नावाने ओळखले जाते. याची पाने घराचे छत शाकारण्यासाठी वापरली जातात. या ताडामधून येणाऱ्या रसापासून वाईनही बनवली जाते. पावसाळ्यामध्ये स्थानिक लोक ताडाच्या पानांची छत्री करून वापरतात. अरब देशांमध्ये याच्या कठीण बियांपासून गळ्यामध्ये अलंकार म्हणून घालण्याच्या माळा बनवल्या जातात.

गार्डनमध्ये रोपे तयार करून, त्यांचे या बागेतच रोपण केले. या ताडांपैकी एका वृक्षाला तब्बल २४ वर्षानंतर प्रथमच ऐतिहासिक फुलोरा बहरला आहे. सेन्चुरी पाम हा स्वदेशी, विशाल व मोहक स्वरुपाचा दुर्मिळ व डौलदार ताडाची मोठ्या उद्यानामध्ये लागवड केल्यास बागेची आणि शहराची शोभा वाढते. त्यामुळे या ताडाचे संवर्धनही होऊ शकेल, असेही डॉ. यादव यांनी सांगितले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठांतर्गत सहा परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत उन्हाळी सत्रात ७४७ अभ्यासक्रमाच्या परीक्षा घेण्यात आल्या. त्यातील पी. जी. डिप्लोमा इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, डिप्लोमा इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बी.आय.डी., सेमिस्टर ५ व ६, बी. आर्च. सेमिस्टर १ व २ च्या ६ परीक्षांचे निकाल शुक्रवारी घोषित झाले. विद्यापीठांत शुक्रवारी बी. ए., बीएबीएड्च्या ५ विषयांच्या परीक्षा झाल्या. ६ हजार २२७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिल्याची माहिती डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

Times of India

# SUK offers dual degree for students

Times News Network

**Kolhapur**: The students of Shivaji University Kolhapur (SUK) can now get dual degrees by applying to any one or two of the graduate and post-graduate courses offered through its distance learning centre.

Recently, the University Grants Commission (UGC) approved the proposal of SUK's distance learning centre to start 12 programmes for distance and online learning.

The admission process for the distance learning centre has started. The university has jurisdiction over three districts and therefore, a large number of students is likely to sign up for it.

D K More, the centre's director, said, "The student enrolled for regular graduation program can also take admission for any other degree program offered through our centre. Any person who wants to get two degrees at the same time can also take admission. The current policy is making the doors of various courses open for all."

According to the central authorities, several people from the working-class, home-makers, part-time workers and the elderly are taking admission to the newly started distance learning programs.